# विचारांची जपणूक हाच क्रांतिकारकांचा खरा सत्कार

## इंदूताई पाटणकर यांचे प्रतिपादन



ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक रंगराव पाटील यांचा कोल्हापुरात रविवारी सत्कार करताना महापौर सुनील कदम. शेजारी बाबूराव धारवाडे, अण्णा डांगे, सौ. कल्पनादेवी पाटील, प्राचार्य पी. बी. पाटील, उपमहापौर गजानन भालकर, माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर.

कोल्हापूर, ता. २५ : **''क्रांतिकारकांच्या विचारांची जपणूक हाच खरा त्यांच्या कार्याचा सत्कार असतो,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्रीमती इंदूताई पाटणकर यांनी आज येथे केले. क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांचा गौरव समितीच्यावतीने सत्कार झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य पी.बी. पाटील होते.**

महापौर सुनील कदम यांच्या हस्ते श्री. पाटील यांचा सत्कार झाला. सौ. कल्पना पाटील यांचा सत्कार श्रीमती पाटणकर यांच्या हस्ते झाला. शाहू स्मारक भवनात झालेल्या सत्कार सोहळ्यास कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते.

श्रीमती पाटणकर म्हणाल्या, ''रंगरावदादा यापूर्वी स्वातंत्र्यासाठी लढले. आता जनतेचा लढा लढत आहेत. रंगरावदादांचा सत्कार हा क्रांतीचा सत्कार आहे. क्रांतिकारकांचा सत्कार केला म्हणजे आपली जबाबदारी संपली, असे समाजाने समजू नये. त्यांच्या विचारांची कुवतीप्रमाणे जपणूक करणे हाच खरा सत्कार आहे.''

प्राचार्य पाटील म्हणाले, ''रंगरावदादा ज्या ध्येयवादासाठी जगले तो ध्येयवाद, विचार आता मागे पडत आहे. सत्यशोधकांची जागा संपत्ती शोधकांनी घेतली आहे. सत्याग्रहाऐवजी प्रत्येकजण आता सत्ताग्रही बनला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या प्रत्येक वळणावर प्रामाणिक माणसे गळून पडताना दिसत आहेत. अशा वातावरणात नवा ध्येयवाद, समाजबांधणी करायची झाल्यास रंगरावदादांच्यासारख्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळेल.''

रंगरावदादा पाटील यांनी सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या वाटचालीत पत्नीचा वाटा मोठा असल्याचे त्यांनी नमूद केले. ते म्हणाले, ''जो संघर्ष करतो तोच खरे जीवन जगतो. प्राथमिक शाळेत असताना मला गोविंद पुराणिक या शिक्षकांकडून संघर्षाचे, जगण्याचे धडे मिळाले. त्याआआधारेच माझी आजअखेरची वाटचाल झाली. स्वातंत्र्यासाठी लढलो, पण स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेली समाजस्थिती पाहू मन विषण्ण होते.''

### सत्तेचे राजकारण करणारे आज राज्यकर्ते

राज्याचे अर्थमंत्री जयंत पाटील सत्यसाईबाबाच्या दर्शनाला गेले असताना त्यांच्या गाडीला अपघात झाल्याचा उल्लेख करून रंगरावदादा पाटील म्हणाले, ''मनगटातील कर्तृत्वापेक्षा हातावरची रेषा आणि घराण्याच्या प्रतिष्ठेचा आधार घेऊन सत्तेचे राजकारण करणारी मंडळी आज महाराष्ट्रात राज्यकर्ते आहेत. ''

यावेळी महापौर कदम, धोंडिराम माळी, बाबूराव कोतवाल, जी.डी. लाड, अण्णा डांगे, प्रा. चंद्रकांत पाटगावकर, [illegible]नाथ चव्हाण, ॲड. डी.एम. पाटील यांची गौरवपर भाषणे झाली. समितीचे स्वागताध्यक्ष शंकरराव नलवडे यांनी स्वागत केले. कार्याध्यक्ष बाबूराव धारवाडे यांनी प्रास्ताविक केले. मानपत्र वाचन माजी कुलगुरू रा.कृ. कणबरकर यांनी केले. 'क्रांतीचे रंग' या गौरव अंकाचे प्रकाशन प्राचार्य पाटील यांच्या हस्ते झाले. प्रारंभी उषाराजे हायस्कूलच्या मुलींनी क्रांतिगीत गायिले. सौ. जयश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिनकर पाटील यांनी आभार मानले.